# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००२८७१**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी**
मृद व जलसंधारण विभाग, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
मृद व जलसंधारण विभाग, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०५.२०२१ | - | ०७.०७.२०२१ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २१.०८.२०२१ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २१.०५.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी केलेली विनंती अर्ज दि.१९.०३.२०२१ वर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांचे उत्तर न मिळाल्याने अपिलार्थींनी दि. ०७.०७.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, त्यांच्या अभिलेखात माहिती अर्ज प्राप्त झाल्याने दिसून येत नाही. आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध माहिती अर्ज व त्यासोबतचे संलग्न पत्र जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आले.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जानुसार उपलब्ध माहिती अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क पुरवावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 12-7-2024

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**

**दिनांक : १२.०७.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ